10



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** सातारा **P.S.(ठाणे):** औंध

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0237 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**12/08/2023 05:51

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 11/08/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/08/2023

**Time From (वेळेपासून):** 14:51 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/08/2023 **Time (वेळ):** 05:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/08/2023 05:51 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जुना एसटीस्टँन्ड बाजार पटांगण, औंध,खटाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): उमेश रामचंद्र चंदवाणी
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1981
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाहोटीनगर, मलकापूर,कराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाहोटीनगर, मलकापूर,कराड,कराड शहर,सातारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दत्तात्रय परशुराम दराडे | | | 1. औंध पोलीस स्टेशन,खटाव, औंध,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | बापुसाहेब नारायण जाधव | | | 1. औंध पोलीस स्टेशन ,खटाव, औंध,सातारा,महाराष्ट्र,भारत |
| 3 | किरण लालासाहेब जाधव | | | 1. औंध पोलीस स्टेशन ,खटाव, औंध,सातारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

खबरी जबाब दिनांक 12/08/2023

मी, उमेश रामचंद्र चंदवाणी, वय 42 वर्षे, व्यवसाय- हॉटेल व परमिट रुम, रा.लाहोटीनगर, मलकापूर, ता.कराड जि.सातारा मो.नं.9595777777 असा असुन मी दि.11/08/2023 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा येथील पोलीस उप अधीक्षक श्रीमती वैद्य मॅडम यांचेशी फोनवर बोलणी करुन माझ्याकडे करण्यात येणाऱ्या लाचेच्या मागणी बाबत तक्रार थोडक्यात सांगितली परंतू मला ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा कार्यालयात येण्यास जमणार नाही तरी तुम्ही औंध येथे येवून माझ्या तक्रारी नुसार कारवाई करावी अशी विनंती मी वैद्य मॅडम यांना केली. त्यानुसार पोउपअधी वैद्य मॅडम यांनी स्वत: मला कारवाईचे पुढील नियोजन थोडक्यात सांगितले.

त्या नियोजनानुसार दि.11/08/2023 रोजी 12.30 वा.चे सुमारास पोउपअधी वैद्य मॅडम या त्यांचे सहकाऱ्यासह औंधच्या अलीकडे घाटमाथा येथे पोहोचले. तेव्हा मी तेथे माझे सहकारी रमेश लावंड व प्रमोद कदम(आण्णा) यांचेसह तिथे हजर होतो. तेव्हा पोउपअधी वैद्य मॅडम यांनी माझी ओळख करुन घेऊन त्यांचे सह असणाऱ्या दोन पंचाची व इतर सहकाऱ्यांची आम्हाला एकमेकांना ओळख करुन दिली. तेव्हा मी माझ्या परमिटरुमधुन दारुची अवैध वाहतुक केल्यामुळे औंध पोलीस स्टेशनला दाखल असले गुन्ह्याच्या अनुषंगाने मला अटक न करण्यासाठी औंध पोलीस स्टेशनचे लोकसेवक दराडे साहेब व दाजी हवालदार हे लाचेची मागणी करत असलेबाबतची तक्रार पंचासमक्ष पोउपअधी वैद्य मॅडम यांना सांगितली व मी लाचेची रक्कम दिली नाही तर मला विनाकारण गुन्ह्यात अटक करतील याची मला भिती असल्याचे सांगितले. त्यानंतर मी माझ्या हाताने लिहिलेली तक्रार पोउपअधी वैद्य मॅडम यांना दिली असता पोउपअधी वैद्य मॅडम व पंचानी ती वाचून बघितली व त्यावर सहया केल्या.

त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी मला पंचासमक्ष पडताळणी कारवाईची माहिती दिली व पडताळणीची प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानंतर पोउपअधी वैद्य मॅडम यांनी पंचासमक्ष मला पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या व पोशि.येवले यांनी माझे शर्टचे आतील बाजूस बनियनला व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन लावून दिले. त्यानंतर 13.15 वा.चे सुमारास मी व पंच नं.1 जगदाळे असे आम्ही दोघे माझ्या चारचाकी क्रं. एम. एच.50 एल 9072 ने औंध पोलीस स्टेशनकडे रवाना झालो. त्यावेळी पोउपअधी वैद्य मॅडम व त्यांचे सहकारी त्यांचे वाहनात तिथेच थांबून राहिले होते.

त्यानंतर मी, माझे सहकारी व पंच जगदाळे असे औंध पोलीस स्टेशनमध्ये गेलो तेव्हा पडताळणी दरम्यान एपीआय दराडे साहेब यांनी अवैध दारु वाहतूक प्रकरणी माझ्या विरुध्द औंध पोलीस स्टेशनला दाखल गुन्हयामध्ये मला अटक न करण्यासाठी व इथून पुढे माझ्या व्यवसायात मला कोणताही त्रास न देण्यासाठी माझ्याकडे 1,00,000/- (1 लाख रुपये) लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम त्यांचे केबीनमध्ये हजर असलेल्या दाजी पोलीस व किरण जाधव या दोघांपैकी कोणाजवळ ही देण्यास सांगितली. तेव्हा केबीनमध्ये हजर असलेल्या किरण जाधव यांनी मला महिन्याचे वाहतूकीचे तरी पैसे दयावेच लागतील. साहेबांनी आता पर्यंत तुम्हाला लय सहकार्य केले आहे असे सांगितले. तसेच मी दाजी पोलीस यांना 1,00,000/-(1 लाख रुपये) ऐवजी 50,000/- रुपये घेण्याची विनंती केली असता पोलीस दाजी यांनी साहेबांनी 1,00,000/-(1 लाख रुपये) सांगितले आहेत तेवढेच दयावे लागतील असे सांगितले.

मी व पंच नं.1 तसेच माझे सहकारी असे आम्ही सर्वजण शासकीय वाहनाजवळ परत आलो तेव्हा वैद्य मॅडम यांनी मला व पंच नं.1 यांना घडलेली हकीकत विचारली व व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण वैद्य मॅडम व पंचांनी ऐकले. त्यानुसार वैद्य मॅडम व पंचांची खात्री झाली की, एपीआय दराडे, पोलीस दाजी व पोलीस किरण जाधव यांनी माझेकडे 1,00,000/ (1 लाख रुपये) लाचेची मागणी केली आहे. ती वेळ 14.51 वा.ची.होती. परंतू वेळे अभावी सदर संभाषणांची स्क्रिप्ट नंतर तयार करण्यात येईल असे वैद्य मॅडम यांनी मला व पंचाना सांगितले.

त्यानंतर वैद्य मॅडम यांनी मला व पंचांना सापळापूर्व पंचनाम्याची कारवाई थोडक्यात समजावून सांगितली व वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार लागलीच शासकीय वाहनामध्ये सापळापूर्व पंचनाम्याची कारवाई पुर्ण करण्यात आली.

त्यानंतर वैद्य मॅडम यांचे सुचनेनुसार पोना.चव्हाण यांनी अंथ्रासिन पावडर लावलेली 1,00,000/-(1 लाख रुपये) इतकी लाचेची रक्कम माझ्या शर्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवून दिली व मला आणि पंच नं.1 यांना सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना देऊन औंध पोलीस स्टेशन येथे रवाना केले. ती वेळ 15.40 वा.चे सुमाराची होती. त्यानंतर मी, माझे सहकारी लावंड, प्रमोद(आण्णा) व पंच नं.1 असे औंध पोलीस स्टेशनला गेलो. तेथे गेल्यावर मी माझे मोबाईल वरुन पोलीस दाजी यांना फोन केला तेव्हा ते थोडयाच वेळात पोलीस स्टेशनला आले. त्यानंतर पोलीस दाजी यांनी गुन्हयामध्ये जप्त केलेला मोबाईल व 3 हजार रुपये रोख रक्कम लावंड याला परत दिली व मला माझे विरुध्द दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने पिवळया कागदावरील नोटीसीचे दोन कागद दिले. त्यानंतर मी पोलीस दाजी यांना लाचेची रक्कम देऊ का असे विचारले असता पोलीस दाजी यांनी मला त्यांचे सोबत येण्यास सांगितले व मला त्यांचे बुलेट गाडीवर घेऊन पोलीस स्टेशनचे बाहेर जुने एसटी स्टॅण्ड, बाजार पटांगण चौकात घेऊन गेले. तेथे गेल्यावर पोलीस दाजी यांनी गाडी थांबविल्यावर मी माझ्या जवळची लाचेची रक्कम काढून पोलीस दाजी यांना दिली व त्यांनी ती घेऊन त्यांचे शर्टचे खिशामध्ये ठेवली. त्यानंतर मी पोलीस दाजी यांना मला पोलीस स्टेशनला माझ्या गाडीजवळ सोडण्यास सांगितले. म्हणून पोलीस दाजी हे मला पुन्हा त्यांचे गाडीवरुन पोलीस स्टेशनकडे घेऊन जात असताना तेथे हजर असलेल्या पंच व सापळा पथकाला मी माझ्या डाव्या हाताने माझ्या डोळयावरील चष्मा काढून लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजीत इशारा केला. तेव्हा लागलीच वैद्य मॅडम व सापळा पथकाने पोलीस दाजी यांना ताब्यात घेतले. ती वेळ 16.00 वा.ची होती. त्यानंतर वैद्य मॅडम यांनी एपीआय दराडे साहेब व पोलीस किरण जाधव यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण ते मिळून आले नाहीत. त्यानंतर वैद्य मॅडम व सापळा पथकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा कार्यालयात येऊन सापळा पंचनाम्याची पुढील कार्यवाही पुर्ण केली. अशा रितीने अवैध दारु वाहतुकीच्या अनुषंगाने माझ्याविरुध्द व माझा सहकारी रमेश लावंड याचे विरुध्द औंध पोलीस स्टेशन गुन्हा रजिष्टर नंबर 236/2023 महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम कलम 65(ई),83 अन्वये दाखल गुन्हयामध्ये मला अटक न करण्यासाठी व माझ्या परमिट रुमच्या व्यवसायाच्या अनुषंगाने दारुची वाहतूक करताना मला कोणताही त्रास न देण्यासाठी एपीआय दत्तात्रय दराडे, यांनी माझेकडे सुरुवातीला 1,50,000/-(दीड लाख रुपये) लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 1,00,000/- (1 लाख रुपये) स्विकारण्याचे कबुल केले व एएसआय बापूसाहेब जाधव(दाजी) व पोलीस शिपाई किरण जाधव यांनी एपीआय दराडे यांना लाचेच्या मागणी मध्ये सहाय्य करुन मदत केली व एएसआय बापूसाहेब जाधव(दाजी) यांनी एपीआय दराडे यांचेसाठी 1,00,000/- (1 लाख रुपये) लाचेच्या रक्कमेचा स्विकार केला म्हणून माझी एपीआय दत्तात्रय दराडे, एएसआय बापूसाहेब जाधव(दाजी) व पोलीस शिपाई किरण जाधव सर्व नेमणूक औंध पोलीस स्टेशन ता.खटाव जि.सातारा यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे एपीआय दत्तात्रय दराडे, एएसआय बापुसाहेब जाधव(दाजी) व पोलीस शिपाई किरण जाधव सर्व नेमणुक औंध पोलीस स्टेशन यांचेशी कसलेही वैयक्तीक वैर नसुन माझा त्यांचेशी कसलाही पैशाचा अर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार नाही.

माझी वरील तक्रार माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर मराठीमध्ये टंकलिखीत करण्यात आली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष हा जबाब दिला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
Gangaprasad Baliram Kendre
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):** DGPGBKM9201
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant. (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** dattatray parshuram
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** dgpdpam8906

पोलीस स्टेशन ऑफिसर
औंध पोलीस स्टेशन